# मंत्रिमंडळ निर्णय

## दिनांक : १४ फेब्रुवारी २०१८

## ( बैठक क्र. १६४ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र औद्योगिक धोरण-२०१३ नुसार स्थापित एसईझेड<br>**एकात्मिक औद्योगिक क्षेत्रांबाबतच्या धोरणात सुधारणा करण्याचा निर्णय** | उद्योग |
| २. | **महसुली विभाग वाटप नियम २०१५ मध्ये सुधारणा**<br>**पतीच्या आई-वडिलांच्या सुश्रुषेसाठीही महिला अधिकाऱ्यांना विभाग बदलाची मुभा** | सामान्य प्रशासन |
| ३. | **वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय खेड येथे स्थापण्यास मान्यता** | विधि व न्याय |
| ४. | **दिव्यांग, वरिष्ठ नागरिक, वंचितांसाठी राज्यात ११ विशेष न्यायालये स्थापणार** | विधि व न्याय |
| ५. | **राज्यात गुंतवणूक व रोजगारनिर्मितीस चालना**<br>**एकात्मिक औद्योगिक क्षेत्रास अधिकच्या सोयी-सवलती** | उद्योग |
| ६. | **एकात्मिक शहरांसाठीची विशेष नगर वसाहत योजना**<br>**लोकाभिमुख आणि व्यवहार्य प्रकल्पांसाठी योजनेच्या नियमावलीत सुधारणेस मान्यता** | नगर विकास |
| ७. | **महात्म्याचे कार्य आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचणार**<br>**महात्मा फुले यांच्यावरील चित्रपटाची नामांकित संस्थेकडून निर्मिती करणार** | सामान्य प्रशासन |
| ८. | **पुणे जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावरील पहिला प्रकल्प**<br>**सेंटर फॉर परफेक्ट हेल्थ एकात्मिक प्रकल्पास अतिविशाल प्रकल्पाचा दर्जा देण्यास मान्यता** | उद्योग |
| ९. | **मराठी भाषा भवनाच्या उभारणीस गती**<br>**रंगभवनऐवजी मुंबईत पर्यायी जागा ऐरोलीत उपकेंद्र उभारण्यास मान्यता** | मराठी भाषा |

## महाराष्ट्र औद्योगिक धोरण-२०१३ नुसार स्थापित एसईझेड एकात्मिक औद्योगिक क्षेत्रांबाबतच्या धोरणात सुधारणा करण्याचा निर्णय

राज्यात महाराष्ट्र औद्योगिक धोरण-२०१३ नुसार स्थापन झालेली विशेष आर्थिक क्षेत्रे त्यानंतरच्या कालावधीत ना-अधिसूचित (Denotify) झाली असून काही त्या प्रक्रियेत आहेत. अशा क्षेत्रांवर एकात्मिक औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी असलेल्या धोरणात सुधारणा करण्याचा निर्णय आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे या क्षेत्रांशी संबंधित जमिनीच्या औद्योगिक वापरात वाढ होणार आहे.

राज्यात विशेष आर्थिक क्षेत्राच्या (एसईझेड) उभारणीसाठी २००६ ते २०१२ या कालावधीत मोठ्या प्रमाणावर प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यानंतर जागतिक मंदी, केंद्र सरकारने बदललेली कर रचना यामुळे निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीमुळे विशेष आर्थिक क्षेत्रापुढे आव्हाने निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर विशेष आर्थिक क्षेत्रे विशेषत: बहुउद्देशीय विशेष आर्थिक क्षेत्र व अभियांत्रिकी विशेष आर्थिक क्षेत्र यांच्याशी संबंधित विशेष आर्थिक क्षेत्रांकडून ना अधिसूचित (Denotify) करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झाले होते.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (एमआयडीसी) आपल्या स्वत:च्या जागेवर काही विशेष आर्थिक क्षेत्रे स्थापन करण्यात आली होती. त्यातील बहुतांशी क्षेत्रे आता ना-अधिसूचित करण्यात आली आहेत. तसेच काही या प्रक्रियेत आहेत. एमआयडीसीने खासगी उद्योजकांबरोबर संयुक्त उपक्रमातून दोन एसईझेड स्थापन केली होती. त्यात भारत फोर्जच्या संयुक्त उपक्रमातून पुणे जिल्ह्यातील खेड आणि नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथे इंडिया बुल्सच्या संयुक्त उपक्रमातून स्थापन झालेल्या एसईझेडचा समावेश आहे.

या धोरणानुसार ना-अधिसूचित होणाऱ्या एसईझेडना आपल्या जमिनीचा वापर खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी करता यावा यासाठी एकात्मिक औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याचा पर्यायही फेब्रुवारी २०१३ मध्ये झालेल्या शासन निर्णयानुसार देण्यात आला आहे. त्यासाठी निश्चित केलेल्या धोरणात सुधारणा करण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार किमान ४० हेक्टर क्षेत्र असणाऱ्या जमिनींवर एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच अशा जमिनी संबंधित विशेष नियोजन प्राधिकाराच्या विकास नियमावलीत समाविष्ट करण्यासाठी एमआरटीपी अधिनियम १९६६ मध्ये जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यासाठी नमूद केलेल्या “नियत दिनांकाशी” संबंधित लागू असणारे निकष काढून टाकण्यात आले आहेत.

विशेष आर्थिक क्षेत्रावर एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी त्यांना प्राप्त होणाऱ्या औद्योगिक वापरासाठी ६० टक्के व पुरक बाबींच्या वापरासाठी ४० टक्के असे सुत्र होते. आता मात्र अशा क्षेत्रांमध्ये एमआयडीसीच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय असणाऱ्या जमिनीच्या वापराचे सुत्र ६०:४० ऐवजी ८०:२० असे करण्यात आले आहे.

खेड इकॉनॉमिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांच्याकडून प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या खेड डेव्हलपर्स लि. या कंपनीस हस्तांतरित होणाऱ्या पंधरा टक्के विकसित भूखंडाच्या क्षेत्रासाठी आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्कास माफी देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. तसेच खेड इकॉनॉमिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीस विनाअधिसूचित झालेल्या क्षेत्रात एकात्मिक औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. नवी मुंबई एसईझेड संदर्भात स्थापन करण्यात आलेली मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समिती याबाबत पुढील कार्यपद्धती निश्चित करणार आहे.

-----०-----

सामान्य प्रशासन विभाग

महसुली विभाग वाटप नियम २०१५ मध्ये सुधारणा

## पतीच्या आई-वडिलांच्या सुश्रुषेसाठीही
## महिला अधिकाऱ्यांना विभाग बदलाची मुभा

शासकीय सेवेतील महिला अधिकाऱ्यांना आपल्या पतीच्या आई-वडिलांच्या गंभीर आजाराच्या कारणास्तवही महसुली विभाग बदलून मिळण्यासाठी विनंती अर्ज करण्यास परवानगी देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यासाठी महसूली विभाग वाटप नियम - २०१५ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय आज घेण्यात आला. या निर्णयामुळे अनेक गरजू महिला अधिकाऱ्यांची सोय होणार आहे.

राज्य शासनातील गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम - २०१५ तयार करण्यात आले आहेत. या नियमानुसार शासकीय अधिकाऱ्यांना स्वत: किंवा आपला जोडीदार, मुले अथवा अवलंबून असलेले आई-वडील यांच्या गंभीर आजाराच्या कारणास्तव महसूल विभाग बदलण्यासाठी विनंती अर्ज करण्याची मुभा होती. यामध्ये सुधारणा करून आता महिला अधिकाऱ्यांनाही आपल्या सासू-सासऱ्याच्या सुश्रुषेसाठीही महसुली विभाग बदलून मिळण्याची विनंती करण्याची मुभा देण्यात आली आहे.

यासोबतच महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी आपापसात महसुली विभाग (Mutual Change) बदलून देण्याची विनंती केल्यास बदली करण्याच्या प्रस्तावासही मान्यता देण्यात आली.

-----०-----

विधि व न्याय विभाग

## वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय
## खेड येथे स्थापण्यास मान्यता

रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय स्थापन करण्यास व या न्यायालयाकरिता आवश्यक पदे निर्माण करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

खेड येथे वरिष्ठस्तर दिवाणी न्यायालय स्थापन झाल्याने खेड, चिपळूण, गुहागर, दापोली व मंडणगड या तालुक्यामधील नागरिकांची व पक्षकारांची गैरसोय दूर होईल. तसेच, या तालुक्यांमधील जनतेच्या दृष्टीने न्यायदान प्रक्रिया जास्त लोकाभिमुख होण्यास मदत होणार आहे. उच्चस्तर सचिव समितीच्या सहमतीने नवीन पदे निर्माण होणार आहेत.

-----०-----

विधि व न्याय विभाग

**दिव्यांग, वरिष्ठ नागरिक, वंचितांसाठी**
**राज्यात ११ विशेष न्यायालये स्थापणार**

राज्यातील दिव्यांग, वरिष्ठ नागरिक आणि समाजातील दुर्लक्षित घटकांना जलद न्याय मिळावा यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला असून या घटकासंबंधी एक हजारहून अधिक प्रकरणे प्रलंबित असलेल्या ११ ठिकाणी विशेष न्यायालये स्थापन करण्याचा आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे या घटकांना जलद न्याय मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

दिव्यांग, वरिष्ठ नागरिक आणि समाजातील दुर्लक्षित घटकांना जलद न्याय मिळावा यासाठी त्यांच्या संबंधी न्यायालयात दाखल असलेली प्रकरणे वेळीच निकाली निघावीत यासाठी आज राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत हा प्रस्ताव सादर करण्यात आला. या घटकांसबंधी जलदगती न्यायालयांच्या धर्तीवर विशेष न्यायालये सुरू करणे शासनाच्या विचाराधीन होते, त्यानुसार या घटकांशी संबंधित एक हजारांहून अधिक प्रकरणे प्रलंबित असलेल्या मुंबई, पुणे, परभणी, ठाणे, अहमदनगर, सातारा, सांगली, लातूर, नागपूर, नाशिक आणि औरंगाबाद येथे विशेष न्यायालये स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली. यासाठी ५५ पदांच्या निर्मितीसह त्यांच्या वेतनासाठी ३ कोटी ६६ लाख १० हजार इतक्या वार्षिक खर्चास तर वार्षिक आवर्ती-अनावर्ती खर्चासाठी १ कोटी १२ लाख ६१ हजार असा एकूण ४ कोटी ७८ लाख ७१ हजार इतक्या खर्चासही मंजुरी देण्यात आली.

-----०-----

उद्योग विभाग

<u>राज्यात गुंतवणूक व रोजगारनिर्मितीस चालना</u>
**एकात्मिक औद्योगिक क्षेत्रास**
**अधिकच्या सोयी-सवलती**

राज्यात अधिकाधिक गुंतवणूक आणि रोजगारनिर्मिती होण्यासाठी एकात्मिक औद्योगिक क्षेत्रास (IIA) अधिकच्या सोयीसुविधा व सवलती देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुसार या क्षेत्रास किमान क्षेत्रफळ, प्रवेश रस्ता, मुद्रांक शुल्क, वीज खरेदी आणि चटई क्षेत्र निर्देशांकामध्ये सवलती मिळणार आहेत.

महाराष्ट्र औद्योगिक धोरण-२०१३ अंतर्गत राज्यात एकात्मिक औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात येतात. मात्र, या क्षेत्राच्या तुलनेत नगरविकास विभागाच्या एकात्मिक विशेष वसाहत प्रकल्प या योजनेत शासनाकडून मिळत असलेल्या सोयी, सुविधा आणि फायदे जास्त आकर्षक असल्यामुळे एकात्मिक औद्योगिक क्षेत्रास आवश्यक प्रमाणात प्रतिसाद मिळत नसल्याचे दिसून आले आहे. तसेच महाराष्ट्राच्या तुलनेत गुजरात, तामिळनाडू, कर्नाटक इत्यादी राज्यांमध्ये उद्योग उभारणीसाठी अधिक सवलती मिळत असल्याने महाराष्ट्राच्या सीमेवरील उद्योग इतरत्र स्थलांतरित होण्याचे प्रयत्न होतात. संबंधित उद्योग राज्यात स्थापन होण्यासाठी उद्योजकांना सोयी-सवलती देऊन आकर्षित करणे गरजेचे असल्यामुळे आजचा निर्णय घेण्यात आला.

स्थानिक परिस्थिती, जमीन संपादनास येणाऱ्या अडचणी, सलगतेने उपलब्ध होणारे क्षेत्र आदींचा विचार करून एकात्मिक औद्योगिक क्षेत्र घोषित करताना किमान क्षेत्रफळाची असलेली ४० हेक्टरची अट आता शिथिल करून ती २० हेक्टरपर्यंत कमी करण्याचा आज महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. तसेच आता किमान १२ मीटरपर्यंत रुंदीचा प्रवेश रस्ता असल्यासही या क्षेत्राला मान्यता मिळणार आहे. यापूर्वी किमान २४ मीटर रस्त्याची अट ठेवण्यात आली होती. एकात्मिक औद्योगिक क्षेत्रामध्ये ६० टक्के (औद्योगिक वापर) व ४०

टक्के (व्यापारी व निवासी वापरासह आधारभूत सुविधा) अशी विभागणी असून यामध्ये ज्या बाबींच्या वापराचा समावेश नाही, अशा बाबींचा ६० टक्क्यामध्ये समावेश करण्यात येईल. मात्र, त्यासाठी विकासकाने कायदेशीर, सुरक्षा, पर्यावरण, पायाभूत सुविधा इत्यादी बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. तसेच व्यापारी व निवासी वापरासह आधारभूत सुविधांच्या ४० टक्क्यांमध्ये समावेश असणाऱ्या बाबींचा औद्योगिक वापराच्या ६० टक्के बाबींमध्ये समावेश होऊ शकणार नाही. मात्र, या तरतुदी शिथिल करण्याचे अधिकार उद्योग विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीला राहणार आहेत.

आजच्या निर्णयानुसार आणखी काही सवलती देण्यात आल्या आहेत. त्यामध्ये विकासक ते प्रथम खरेदीदार यांच्यातील प्रथम व्यवहारास विशेष नगर वसाहत प्रकल्पाच्या धर्तीवर ५० टक्क्यांपर्यंत मुद्रांक शुल्क माफी देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे एकात्मिक औद्योगिक क्षेत्रासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून विकासकांना रेडीरेकनर दराच्या एक टक्के विकास शुल्क आकारण्यात येते. विकासकास या विकास शुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. मात्र, नगरविकास विभागाने विशेष नगर वसाहत प्रकल्पांसाठी असलेल्या मुद्रांक शुल्क माफी आणि विकास शुल्कामध्ये सुधारणा केल्यास त्या एकात्मिक औद्योगिक क्षेत्रासही लागू राहतील. मुक्त प्रवेश (Open Access) विनियम-२०१६ मधील तरतुदींनुसार एकात्मिक औद्योगिक क्षेत्रातील ज्या ग्राहकांची मागणी एक मेगावॅटपेक्षा जास्त आहे, अशा ग्राहकांनाच मुक्त प्रवेशाद्वारे अन्य वीज पुरवठादाराकडून वीज घेण्याची मुभा आहे. मात्र, आता एकात्मिक औद्योगिक क्षेत्रातील सर्व उद्योग घटकांची अथवा काही उद्योग घटकांची विजेची गरज एक मेगावॅटपेक्षा जास्त असल्यास त्याठिकाणी विकासक स्वत:च्या खर्चाने सबस्टेशन उभारून मुक्त प्रवेशाद्वारे अन्य वीज पुरवठादारांकडून वीज खरेदी करू शकेल. तसेच या क्षेत्रातील उद्योग घटकांना वीजपुरवठा करण्याची मुभा त्यास देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे या क्षेत्रातील विकासक किंवा उद्योजकास विद्युत नियम-२००५ मधील तरतुदीनुसार स्वत: विद्युत निर्मिती (Captive Power Generation) करता येईल.

एकात्मिक औद्योगिक क्षेत्रासाठी आता विशेष नगर वसाहत प्रकल्पासाठी देण्यात आलेला चटई क्षेत्र व अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक लागू राहील. त्यानुसार विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. एकात्मिक औद्योगिक क्षेत्र स्थापन करताना संपादित क्षेत्राच्या सलगतेसाठी विकासकास काही वेळा सरकारी क्षेत्राची आवश्यकता भासते. संबंधित सरकारी क्षेत्र निर्बाध्य असल्यास त्याच्या बाजारमुल्याच्या दरानुसार विकासकास हस्तांतरण करण्याची कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास आता करता येईल. एकात्मिक औद्योगिक क्षेत्रातील खऱ्याखुऱ्या औद्योगिक किंवा इतर अकृषिक वापरासाठी महाराष्ट्र शेतजमीन (कमाल जमीन धारणा) अधिनियम-१९६१ मधील कलम ४७ (२) (सी) या तरतुदीनुसार शेतजमीन खरेदी करता येईल. या तरतुदीनुसार विकासकांनी शेतजमीन खरेदी करण्यापूर्वी शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. तसेच शेतजमीन खरेदी केल्यानंतर अंतिमत: त्या जमिनीचा तपशील शासनास अधिसूचित करण्यासाठी कळविणे आवश्यक असेल.

-----०-----

एकात्मिक शहरांसाठीची विशेष नगर वसाहत योजना

## लोकाभिमुख आणि व्यवहार्य प्रकल्पांसाठी योजनेच्या नियमावलीत सुधारणेस मान्यता

राज्यात एकात्मिकृत शहरे विकसित करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या विशेष नगर वसाहत योजनेच्या विनियमांमध्ये आणखी सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या सुधारणांमुळे विशेष नगर वसाहतींचे प्रकल्प अधिक लोकाभिमुख आणि व्यवहार्य होण्यास मदत होणार आहे.

केंद्र शासनाच्या धोरणानुसार एकात्मिकृत शहरे विकसित करण्यासाठी राज्य शासनाने विशेष नगर वसाहतीचे धोरण मंजूर केले आहे. त्यानुसार खासगी गुंतवणुकीस प्रोत्साहन देणे, किफायतशीर दरात घरे उपलब्ध करणे, गुंतवणुकदारांसाठी योग्य वातावरण निर्माण करणे यासाठी नियमावली तयार करण्यात आली आहे. ही नियमावली राज्यातील मंजूर प्रादेशिक योजना, महानगरपालिका-नगरपालिकांच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ट करण्याचे प्रस्तावित करुन वेळोवेळी त्यामध्ये फेरबदलही मंजूर करण्यात आले आहेत. सर्व प्रादेशिक योजना क्षेत्रात विशेष नगर वसाहती विकसित करण्याबाबतचे विनियम समाविष्ट करण्यात आले आहेत.

या मंजूर धोरणानुसार मोठ्या प्रमाणावर विशेष नगर वसाहत प्रकल्प विकसित व्हावेत, विशेष नगर वसाहतींचे नियम अधिक लोकाभिमुख व्हावेत आणि किफायतशीर घरे उपलब्ध व्हावीत, या उद्देशाने या विनियमांमध्ये २४ मे २०१६ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत सुधारणा करण्यात आल्या. हरकती व सूचना मागवून सर्व वैधानिक कार्यवाही करण्यात आली आणि ९ डिसेंबर २०१६ व २६ डिसेंबर २०१६ अशा दोन टप्प्यात अधिसूचना काढण्यात आली. ही अधिसूचना प्रकाशित केल्यानंतर अधिमूल्य आकारणी, मुद्रांक शुल्कामध्ये सवलत याबाबतची काही निवेदने शासनाकडे प्राप्त झाली. त्यांचा विचार करता तसेच शासनाकडे प्राप्त झालेल्या विशेष नगर वसाहती प्रकरणांची छाननी केल्यानंतर, योजनेची अंमलबजावणी सुलभ व्हावी म्हणून या विनियमांमध्ये आणखी सुधारणा करण्याची आवश्यकता भासत होती. त्यामुळे नव्याने बदल व सुधारणा करण्यात आले आहेत.

ग्रामीण क्षेत्रामध्ये तसेच शहरी क्षेत्रामध्ये विशेष नगर वसाहतीसाठी मालमत्ता करामध्ये सवलत, ग्रामीण क्षेत्रामध्ये तसेच शहरी क्षेत्रामध्ये विशेष नगर वसाहतीसाठी खरेदी करावयाच्या जमिनीसाठी मुद्रांक शुल्कामध्ये सवलत, केंद्र शासनाकडून रद्द करण्यात आलेल्या विशेष आर्थिक क्षेत्र प्रकल्पाखालील जमिनी तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण क्षेत्रातील जमिनी त्यांच्या कायद्यातील तरतुदींच्या अटीनुसार विशेष नगर वसाहतींमध्ये समाविष्ट करणे, महानगरपालिका-विशेष नियोजन प्राधिकरणांच्या क्षेत्रातील नगर वसाहतीमध्ये एकूण क्षेत्राच्या दोन टक्के जागा संबंधित नियोजन प्राधिकरणाला विनामूल्य देणे या प्रस्तावित बाबींचा ठळक दुरुस्त्यांमध्ये समावेश आहे. याशिवाय अकृषक आकारणीमध्ये सवलत, छाननी शुल्कामध्ये सवलत इत्यादी प्रकारच्या सवलतीदेखील प्रस्तावित केल्या आहेत.

-----o-----

सामान्य प्रशासन विभाग

महात्म्याचे कार्य आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचणार

## महात्मा फुले यांच्यावरील चित्रपटाची नामांकित संस्थेकडून निर्मिती करणार

थोर समाज सुधारक महात्मा जोतिबा फुले यांचे जीवनकार्य राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचावे यासाठी त्यांच्या जीवनावरील चित्रपटाची निर्मिती नामांकित आणि व्यावसायिक संस्थेकडून करण्यात येणार आहे. मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषांत तयार होणारा हा चित्रपट वर्षभरात पूर्ण करण्यात येणार असून यासाठी ई-निविदा मागवून संस्थेची निवड करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

महात्मा फुले यांचे संघर्षमय जीवन व कृतिशील विचारांचा आढावा या चित्रपटात घेण्यात येणार असून तो ऐतिहासिक सत्यावर आधारित असण्यासह या थोर महात्म्याचे जीवनकार्य यथार्थपणे साकारले जावे यासाठी शासनाकडून तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यात येणार आहे. दर्जेदार चित्रपट निर्मितीचा अनुभव आणि वितरणाची सक्षम व्यवस्था असणाऱ्या संस्थांकडून ई-निविदा मागविण्यात येऊन पारदर्शक पद्धतीने संस्थेची निवड करण्यात येईल.

चित्रपट निर्मितीचे अर्थकारण, वितरणासाठीचे अत्याधुनिक मार्ग, प्रदर्शनासाठीची नवीन तंत्रज्ञानयुक्त माध्यमे आणि मल्टिप्लेक्समुळे चित्रपट वितरणाचे बदललेले व्यावसायिक गणित या सर्व बाबींचा विचार या चित्रपट निर्मितीसाठी करण्यात येणार आहे. चित्रपटाच्या निर्मितीबरोबरच वितरण आणि प्रदर्शनासाठी व्यापक प्रसिद्धीला महत्त्व देण्यात येणार आहे. यासाठी व्यावसायिक कौशल्याचा वापर करून जनतेपर्यंत महात्मा फुले यांचे जीवनकार्य आणि विचार या चित्रपटाच्या माध्यमातून पोहोचतील यादृष्टीने प्रयत्न करण्यात येतील. मूळ विषयाशी प्रामाणिक राहून उत्कृष्ट दर्जाचा व्यक्तीचित्रणात्मक चित्रपट तयार करून तो व्यापक पातळीवर लोकांपर्यंत पोहोचेल अशाप्रकारे वितरित करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. याच उद्देशाने शासनाकडून या चित्रपटासाठी अनुदान देण्यात येत आहे.

-----o-----

उद्योग विभाग

पुणे जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावरील पहिला प्रकल्प

## सेंटर फॉर परफेक्ट हेल्थ एकात्मिक प्रकल्पास अतिविशाल प्रकल्पाचा दर्जा देण्यास मान्यता

पुणे जिल्ह्यातील वहाणगाव (ता. मावळ) येथील सेंटर फॉर परफेक्ट हेल्थ या एकात्मिक प्रकल्पास प्रायोगिक तत्त्वावर राज्यात प्रथमच ५०० कोटी रुपये गुंतवणुकीच्या निकषावर अतिविशाल प्रकल्पाचा दर्जा देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच उद्योग, पर्यटन व वैद्यकीय शिक्षण धोरणानुसार या प्रकल्पाला लाभ देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

महर्षि वेदोद्धारक फाऊंडेशन आणि महर्षि वेदिक हेल्थ प्रा. लि. यांच्याद्वारे सेंटर फॉर परफेक्ट हेल्थ या विशेष घटक यंत्रणेची स्थापना करण्यात आली आहे. या एकात्मिक प्रकल्पाद्वारे वहाणगाव येथे एकूण २६४ एकर जागेवर एक हजार कोटी रुपये गुंतवणूक करून सुमारे ५ हजार व्यक्तींसाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे. त्यामध्ये आयुर्वेदिक औषध निर्मिती, ध्यान धारणा, वेलनेस सेंटर, योगाभ्यास, आयुर्वेदिक महाविद्यालयाची उभारणी प्रस्तावित आहे. राज्यात प्रथमच प्रायोगिक तत्त्वावर पर्यटन, उद्योग क्षेत्रातील रोजगार निर्मिती आणि परिसर विकास यांचा मेळ साधणाऱ्या या नावीण्यपूर्ण उपक्रमास शासनाने प्रोत्साहन दिले आहे. अतिविशाल प्रकल्पाचा दर्जा देण्यासाठी पर्यटन धोरण आणि उद्योग धोरण या दोन्ही

धोरणांमध्ये नमूद निकषांपैकी प्रत्येकी एक निकष हा प्रकल्प पूर्ण करीत आहे. यामुळे ५०० कोटी रुपये गुंतवणुकीच्या निकषावर त्यास अतिविशाल प्रकल्पाचा दर्जा मान्य करण्यात आला आहे. या प्रकल्पास ५०० कोटींच्या गुंतवणुकीनंतर उद्योग, पर्यटन व वैद्यकीय शिक्षण धोरणानुसार लाभ मिळू शकतील.

या प्रकल्पाच्या उद्योग घटकामध्ये आयुर्वेदिक औषध निर्मिती, ॲरोमा व औषधीय तेल निर्मिती, सेंद्रीय शेतीमधून निर्माण होणाऱ्या शेतमालावर प्रक्रिया करणारे केंद्र तसेच शीतगृहाची निर्मिती यासाठी २०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येईल. आरोग्य-वैद्यकीय घटकामध्ये आरोग्य केंद्र, एकात्मिक वैद्यकीय केंद्र, आयुर्वेद महाविद्यालय, आयुर्वेदानुसार मान्यता प्राप्त असलेल्या उपचार पद्धतींसाठी लागणाऱ्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण केंद्र या सर्वांसाठी २०० कोटींची गुंतवणूक प्रस्तावित आहे. पर्यटन घटकामध्ये वेदिक व शैक्षणिक पार्क (योगाभ्यासासह), आयुर्वेदामध्ये नमूद उपचार पद्धतींचा अवलंब, वेलनेस सेंटर, वेद संशोधन केंद्र, जलक्रीडा, सेंद्रीय व आयुर्वेदिक शेती या सर्वांसाठी ५०० कोटींची गुंतवणूक प्रस्तावित आहे. सेंटर फॉर परफेक्ट हेल्थ यांचा ग्लोबल कन्ट्री ऑफ वर्ल्ड पीस (नेदरलँड) या संस्थेसोबत द्विपक्षीय करार झाला आहे. या संस्थेद्वारे आयुर्वेदिक प्राचीन ज्ञान व आरोग्यविषयक तंत्र पुरवण्यात येणार आहे. मानवाच्या आरोग्याचा व्यापक अभ्यास आणि वैद्यकीय सुविधा यासाठी तांत्रिक सहाय्यदेखील पुरविण्यात येणार आहे.

-----०-----

मराठी भाषा विभाग

**<u>मराठी भाषा भवनाच्या उभारणीस गती</u>**

**रंगभवनऐवजी मुंबईत पर्यायी जागा**

**ऐरोलीत उपकेंद्र उभारण्यास मान्यता**

राज्य सरकारतर्फे मुंबईत उभारण्यात येणाऱ्या मराठी भाषा भवनाला आता गती देण्यात आली असून दक्षिण मुंबई परिसरातील महत्त्वाच्या भागात या भवनाच्या प्रशासकीय कार्यालयांची उभारणी करण्याबाबत मराठी भाषा विभागाच्या मंत्री स्तरावर निर्णय घेण्याचे अधिकार आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आले. कार्यक्रमांसह इतर अनुषंगिक वापरासाठी नवी मुंबईतील ऐरोली येथे उपकेंद्र उभारण्यासही आज मंजुरी देण्यात आली.

यापूर्वी घेण्यात आलेल्या निर्णयानुसार दक्षिण मुंबईतील धोबी तलाव परिसरात रंगभवन येथे मराठी भाषा संशोधन, विकास व सांस्कृतिक केंद्राची (मराठी भाषा भवन) उभारणी करण्यात येणार होती. मात्र, रंगभवनची वास्तू हेरिटेज यादीत समाविष्ट असल्याने या जागेवर भाषा भवन उभारण्यास तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे हा निर्णय रद्द रण्यात आला आहे. चर्चगेट, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, जे.जे. स्कुल ऑफ आर्ट, फोर्ट किंवा वांद्रे-कुर्ला वसाहत परिसरात भाषा भवनाची वास्तू उभारण्याबाबत मराठी भाषा विभागाच्या स्तरावर निर्णय घेण्याचे आज ठरविण्यात आले. यासोबतच विविध कार्यक्रम-उपक्रमांच्या आयोजनासह निवासी-संशोधनात्मक वापरासाठी नवी मुंबईतील ऐरोली येथे उपकेंद्राची इमारत उभारण्याचा निर्णयही घेण्यात आला.

-----०-----